## थोडक्यात महत्त्वाचे



इचलकरंजी भाजपाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात जोरदार निदर्शने करण्यात आली

# भाजप इचलकरंजीच्यावतीने आम. जितेंद्र आव्हाड यांचा निषेध

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** रायगड जिल्ह्यातील महाड येथील आंदोलनामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो असलेला छायाचित्र फाडले. या कृतीचा इचलकरंजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात जोरदार निदर्शने करून जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी भाजपा ग्रामीणचे सरचिटणीस शहाजी भोसले म्हणाले, लोकसभा निवडणुकीत भाजपा आरक्षण बदलणार म्हणून टाहो फोडणाऱ्या आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देशाचे संविधान लिहणारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र असलेला फोटो फाडून त्यांचा अपमान केला आहे. या कृतीमुळे महाविकास आघाडीचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर असणारे बेगडी प्रेम दिसून आले आहे, असा आरोप करत त्यांच्या कृतीचा जाहीर निषेध केला. यावेळी नागुताई लोंढे, नीता भोसले, सरचिटणीस बालकृष्ण तोतला, अनिस म्हालदार, उमाकांत दाभोळे, अमित जावळे, प्रदीप मळगे, अमर कांबळे, मनोज साळुंखे, प्रसाद खोबरे आदी भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.



कोल्हापूर : जितेंद्र आव्हाड यांच्या निषेधार्थ बिंदू चौकात निदर्शने करताना भाजपा पदाधिकारी (छाया : मालोजी केरकर)

# जितेंद्र आव्हाडांना तात्काळ अटक करा

## - भाजपाच्यावतीने जोरदार निदर्शने

**केसरी वृत्तसेवा**

**कोल्हापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केल्याच्या निषेधार्थ भाजपा कोल्हापूर च्या वतीने जिल्हाध्यक्ष विजय जाधव यांच्या नेतृत्वाखाली बिंदू चौकात जोरदार निदर्शने करण्यात आली. सर्वप्रथम भाजपा जिल्हाध्यक्ष विजय जाधव, प्रदेश सचिव महेश जाधव, उत्तर विधानसभा प्रमुख सत्यजित कदम यांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करण्यात आला. जिल्हाध्यक्ष विजय जाधव म्हणाले, भाजपने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान केला आहे, तर काँग्रेस पक्षाने वारंवार अपमान करण्याचे काम केले आहे. यावेळी भाजपा उत्तर विधानसभा प्रमुख सत्यजित कदम, उपाध्यक्ष हेमंत आराध्ये, गणेश देसाई, आप्पा लाड, राजू मोरे, अमर साठे, दिग्विजय कालेकर, किरण नकाते, विशाल शिराळे, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मतमोजणीच्या अनुषंगाने ४ जून रोजी वाहतूक मार्गात बदल

**केसरी वृत्तसेवा**

**कोल्हापूर :** कोल्हापूर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी रमणमळा येथील शासकीय धान्य गोडावून जवळील बहुउद्देशीय हॉल रमणमळा या ठिकाणी तर हातकणंगले लोकसभा मतदार संघाची मतमोजणी राजाराम तलाव, सरनोबतवाडी येथे असलेल्या नवीन प्रशासकीय इमारत, राजाराम तलाव येथे ०४ जून २०२४ रोजी होणार असून या अनुषंगाने वाहतूक मार्गात बदल करण्यात येत असल्याचे पोलीस अधीक्षक महेंद्र पंडीत यांनी कळविले आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३४ अन्वये या परिसरातील मोटार वाहनांची वाहतुक सुरळीत व सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच नागरिक, मोटार वाहन चालक व रहिवाशी यांना सुरक्षितता प्रस्थापित व्हावी तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये यासाठी खालील नमूद मार्गावर (शासकीय व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना वगळून) प्रवेश बंद करण्यात येत आहे. तेथील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे.

# मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेश सुरु

**केसरी वृत्तसेवा**

**कोल्हापूर :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत इचलकरंजी येथे असणार्या १२५ वी जयंती मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहामार्फत मागासवर्गीय समाजातील विद्यार्थिनींची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी वसतिगृहात मोफत प्रवेश देण्यात येत आहे. यासाठी शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मध्ये ८ वी, ११ वी, व्यावसायिक महाविद्यालय, बिगर व्यावसायिक महाव्दियालयामध्ये कोल्हापूर शहर व परिसरामधील प्रवेश घेऊ इच्छुक विद्यार्थिनींनी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, कोल्हापूर १२५ वी जयंती मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, इचलकरंजी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहाच्या गृहपालांनी केले आहे.

# संभाव्य महापुराचा सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज ठेवा

## - जिल्हाधिकारी येडगे

**केसरी वृत्तसेवा**

**कुरुंदवाड :** आपत्ती ही सांगून येत नाही अचानक संभाव्य महापूराची परिस्थिती निर्माण झाल्यास महापुराचा सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज ठेवा. नागरिकांना महापुराच्या बाबतीत वरिष्ठ प्रशासनाकडून मिळालेल्या सूचनेनुसार तात्काळ स्थलांतर करा. जलमार्गाने हवाई मार्गाने ही स्थलांतर करण्याची यंत्रणा सज्ज ठेवा नागरिकांनीही प्रशासनाच्या वेळोवेळी येणाऱ्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले.

कुरुंदवाड येथे संभाव्य महापुराच्या पार्श्वभूमीवर शहराला भेट दिली असता यावेळी जिल्हाधिकारी येडगे बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, प्रांताधिकारी मोसमी चौगुले, तहसीलदार अनिल कुमार हेळकर, पंचायत समितीचे नारायण घोलप, मुख्याधिकारी अशीष चौहानसह आदी प्रमुख उपस्थित होते.



कुरुंदवाड : येथे महापुराच्या तयारीची माहिती घेताना जिल्हाधिकारी अमोल येडगे व उपस्थित अधिकारी.

मुख्याधिकारी चौहान म्हणाले, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पालिकेने २ यांत्रिकी बोट, लाईफ जॅकेट व आपत्तीचा सामना करण्यासाठी सामग्री तयार ठेवल्या आहेत. पालिकेत आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आले आहे. हे कक्ष नागरिकांच्या सेवेसाठी २४ तास कार्यरत असणार आहे. पूरग्रस्तांना स्थलांतरित करण्यासाठी हवाई मार्गाचा अवलंब करावा लागला तर सीताबाई पटवर्धन हायस्कूल येथे हेलिपॅड तयार करण्यात आले आहे. मजरेवाडी रस्ता येथील औद्योगिक वसाहतीत जनावरांचे स्थलांतर करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे चारा छावणी लावण्याबाबत सांगितले.

महापुराच्या काळात औषधांचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र व पंचायत समितीने आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवल्याचे डॉ. पांडुरंग खटावकर यांनी सांगितले.

यावेळी रविराज फडणीस, उपनिरीक्षक सागर पवार, वीज वितरण कंपनीच्या अभियंता प्रियंका पाटील, मंडळ अधिकारी बबन पटकारे, तलाठी प्रतीक्षा ढेरे, प्रदीप बोरगे, अनिकेत भोसले, अमोल कांबळे, अभिजित कांबळे आदी विविध खात्याचे पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी येडगे यांच्याकडून इचलकरंजीची पाहणी

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** संभाव्य महापुराच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी इचलकरंजी शहरास भेट देऊन शेळके मळा, पंचगंगा नदी घाट या ठिकाणची पाहणी केली. यावेळी आयुक्त तथा प्रशासक ओमप्रकाश दिवटे, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकेयन, उपविभागीय अधिकारी मोसमी चौगुले उपस्थित होते.

यावेळी इचलकरंजी महानगरपालिकेच्या आपत्कालीन विभागाकडे उपलब्ध असलेल्या साधन सामग्रीची सविस्तर माहिती आपत्कालीन विभागाचे संजय कांबळे यांनी दिली. यामध्ये यांत्रिक बोट साधी फायबर बोट, स्टिल कटर, वुड कटर, लाईफ जॅकेट, रिफ्लेक्टीव्ह जॅकेट, लाईफ रिंग, दोर, मेगा फोन, गळ, ट्यूब, इमर्जन्सी लॅम्प, स्नेक हँगर आदी साहित्य तसेच फायर बुलेट, फायर फायटर, रुग्णवाहिका, हायड्रोलिक प्लॅटफार्म, औषध फवारणी ट्रॅक्टर याचा समावेश आहे.



कोल्हापूर जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी इचलकरंजी येथे शेळके मळा, पंचगंगा नदी घाट या ठिकाणची पाहणी केली.

यावेळी सर्व यंत्रसामग्री सुस्थितीत असल्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी घेतली महापुराची परिस्थिती निर्माण झाल्यास अचूक नियोजन करण्याच्या सुचना दिल्या.

याप्रसंगी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रसाद संकपाळ, अप्पर तहसीलदार सुनील शेरखाने, सहा आयुक्त केतन गुजर, सुभाष देशपांडे, डॉ. सुनिलदत्त संगेवार, सौरभ साळुंखे, नितिन बनगे, अभय शिरोलीकर, बाजी कांबळे, विजय पाटील, वरद विनायक बोट क्लबचे गणेश बरगाले, यांत्रिक बोट जवान, फायर फायटर जवान, तेजोनिधी रेस्क्यू फोर्सचे सदस्य, पोलिस बॉईजचे सदस्य, लक्ष्मी प्रोसेसची रुग्णवाहिका तसेच शहरातील पट्टीचे पोहणारे, प्राणी मित्र उपस्थित होते.



जयसिंगपूर : येथे विनापरवाना असलेले होर्डिंग्ज हटविताना पालिकेचे कर्मचारी. (छाया-राहुल मोरे)

# जयसिंगपुरात धोकादायक होर्डिंग्ज पालिकेने हटविले

**केसरी वृत्तसेवा**

**जयसिंगपूर :** मुंबई येथे होर्डिंग कोसळल्याच्या घटनेनंतर शिरोळ तालुक्यात कायदेशीर व बेकायदेशीर असलेल्या होर्डिंगबाबत जयसिंगपूर पालिकेने कारवाईचे पाऊल उचलले आहे. शहरातील बसस्थानकासमोर असणाऱ्या बगीच्यालगत धोकादायक असणारे होर्डिंग्ज पालिकेने हटवले. अनेकांनी आतापर्यंत स्ट्रक्चरल ऑडिट करून त्यांचे प्रमाणपत्र पालिकेकडे सादर केले आहे.

मुंबई येथील घटनेमुळे राज्यातील होर्डिंगचा विषय चर्चेत आला आहे. त्यामुळे नगरपालिकेकडून शहरात किती होर्डिंग आहेत. ते कायदेशीर आहेत की बेकायदेशीर आहेत, यांची चौकशी केली आहेत. जयसिंगपूर ३० होर्डिंग असून त्यांचे मालक १९ आहेत. जयसिंगपूर पालिकेने होर्डिंगसह संबंधित इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिटचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी पालिकेने नोटीसा दिल्या होत्या. त्यानंतर अनेकांनी पालिकेकडे हे प्रमाणपत्र सादर केले आहे. पालिकेने विनापरवाना व या चालू वर्षात परवाना न घेतल्याने शिवाय स्ट्रक्चर ऑडिट प्रमाणपत्रे न सादर केलेले होर्डिंग्ज क्रेनच्या सहाय्याने हटविण्यात आले.

हि कारवाई मुख्याधिकारी टिना गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी प्रमिला माने, बांधकाम अभियंता रामचंद्र कुंभार, जमीर मुश्रीफ, संदिप कांबळे, मिळकत निरीक्षक शितल कांजर, निखिल सिध्दगणेश, रवि कांबळे यांच्यासह कर्मचार्यांच्या पथकांनी हे होर्डिंग्ज हटविण्याची कारवाई केली आहे.



इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत रस्त्यावर बेवारस उभ्या हातगाड्या जप्त करण्यात आल्या.

# इचलकरंजी महापालिकेच्यावतीने अतिक्रमण निर्मूलन मोहीम तीव्र

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** इचलकरंजी महानगरपालिके मार्फत पोलिस बंदोबस्तात गुरुवारपासून अतिक्रमण निर्मूलन मोहिम हाती घेण्यात आली आहे. सदर मोहिमे दरम्यान रस्त्यावर अतिक्रमण करून विनापरवाना विक्री करणारे फेरीवाले, हातगाडीधारक तसेच इतर विक्रेते यांच्यावर कडक कारवाई करण्यात आली व मोहिमे दरम्यान रस्त्यावर बेवारस उभ्या हातगाड्या जप्त करण्यात आल्या आहेत.

आयुक्त तथा प्रशासक ओमप्रकाश दिवटे यांच्या निर्देशानुसार उपायुक्त प्रसाद काटकर यांच्या आदेशानुसार शहर अभियंता महेंद्र क्षिरसागर आणि सहा. संचालक नगर रचना प्रशांत भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली जवळपास ४७ कर्मचाऱ्यांची दोन पथके नियुक्त करण्यात आली आहेत. यापैकी शहर अभियंता महेंद्र क्षिरसागर यांचे नेतृत्वाखालील पथकाने छत्रपती शाहू महाराज पुतळ्यापासून अतिक्रमण निर्मूलन मोहीम सुरु करुन के. एल. मलाबादे चौक या मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणे हटविली. तसेच सहा संचालक नगररचना प्रशांत भोसले यांच्या नेतृत्त्वाखालील पथकाने शिवतीर्थ पासून अतिक्रमण निर्मूलन मोहीम सुरु करुन अटलबिहारी वाजपेयी चौक या स्टेशन रोडवरील अतिक्रमण हटविले. या मोहिमेत एकुण २९ हातगाडे, १५ लोखंडी स्टँण्ड जप्त करण्यात आलेले आहे.

### कडक कारवाई करणे गरजेचे

मोहिमेच्या धास्तीने फेरीवाल्यानी आपले व्यवसाय बंद ठेवणे पसंद केले, तर फळविक्रेते मात्र गल्लीबोळात फिरुन व्यवसाय करत होते. मोहिम सुरू असेपर्यत व्यवसाय बंद ठेवायचे आणि २ दिवसांनी परत सुरू करायचे, असा फंडा झाला असून मोहिमेत सातत्य आवश्यक आहे. तसेच फिरते पथकास अधिकार देऊन कडक कारवाई झाल्याशिवाय अतिक्रमण कमी होणार नाही.

मोहिमेमध्ये सहा आयुक्त केतन गुजर, विद्युत अभियंता संदीप जाधव, सहा. नगररचनाकार हरिश्चंद्र पाटील, अमरजित लकडे, रचना सहायक नितिन देसाई, अविनाश बन्ने, प्रियांका बनसोडे, क्षेत्रीय अधिकारी दिपक खोत, प्रशांत आरगे यांच्यासह महानगरपालिका कर विभागाकडील अधिकारी कर्मचारी तसेच शहरातील तीनही पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी सहभागी झाले होते.

### चंदन यात्रा उत्सवादरम्यान स्फोट

**पुरी :** ओडिशातील पुरी येथे भगवान जगन्नाथाच्या चंदन यात्रा उत्सवादरम्यान फटाक्यांचा स्फोट होऊन तीन जण ठार, तर ३२ जण जखमी झाले. पोलिसांनी गुरुवारी ही माहिती दिली. उपचारादरम्यान तीघांचा मृत्यू झाला.

**एल&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** सांगली

L&T Finance

## तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 [54 चा 2002] अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 30.05.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. रोहित किशोर कुलकर्णी 2. रसिका रोहित कुलकर्णी 3. अनुराधा किशोर कुलकर्णी 4. गौरी कुलकर्णी (मृत सह-कर्जदार राहूल किशोर कुलकर्णी ह्यांचे कायदेशीर वारसदार) 5. मृण्मयी कुलकर्णी (मृत सह-कर्जदार राहूल किशोर कुलकर्णी ह्यांचे कायदेशीर वारसदार, पालक गौरी कुलकर्णीद्वारे) | प्रत्येक आणि सर्व भाग असलेल्या मालमत्तेचा पत्ता: बिअरिंग फ्लॅट नं.A-1, क्षेत्रफळ 81.56 चौरस मीटर्स बिल्ट अप आणि 102.59 चौरस मीटर्स सुपर बिल्ट विभाग, जो पहिला मजला, ''अदित्य सहनिवास'' नावाने परिचित असलेल्या गवर्नमेंट कॉलनी/विद्या कॉलनीच्या इमारतीत आहे, राधाकृष्ण आणि गजानन महाराज मंदिराजवळ, आर.एस.आर नं.160/1, प्लॉट नं.4, वर ही इमारत स्थित आणि उभी आहे, तसेच सांगली स्थानिक मर्यादित आहे, मिरज, कुपवाड, म्युनिसिपल कॉर्पोरेशन, तालुका-मिरज, जिल्हा-सांगली आणि सब रजिस्टर मिरज यांच्या अधिकारक्षेत्रात आहे, महाराष्ट्र भारत 416416. सीमा: पूर्व - आर.एस.नं. 161; पश्चिम - रस्ता; उत्तर - फ्लॅट नं. A-2; दक्षिण - प्लॉट नं. 3 | KOHHL18 000214 आणि KOHHL18 000215 | 15 मे 2024 | रु. 3,08,980 | रु. 48,31,667.55 | रु. 30,89,800 | आधी अपॉइंटमेंट घेऊन कामकाजाच्या सर्व दिवशी | 10.07.2024 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5:30 |

### सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **09/07/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **10/07/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **11/07/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव - अशोक लब्दे, संपर्क क्रमांक 9637764444, ऑफिस: एल&टी फायनान्स लि. - ऑफिस क्रमांक 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005, आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लि. - ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता ई-लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 01.06.2024
**ठिकाण:** सांगली

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड